जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ निवडणूक : आज निकाल

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळ निवडणुकीची मतमोजणी आज सोमवार दि. २० रोजी सकाळी आठ वाजल्यापासून होणार आहे. पदवीधर वगळता बहुतांश गटांत नव्वद टक्क्यांच्या आसपास मतदान झाले आहे. आता या निकालाकडे लक्ष लागून राहिलेले आहे. दरम्यान, विद्यापीठ शिक्षक संघ आणि विद्यापीठ विकास आघाडी या दोन्हींकडून विजयाचे दावे केले जात आहेत.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी शुक्रवारी कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्ह्यातील चुरशीने सरासरी ६२ हून अधिक टक्के मतदान झाले. एकूण ७२ जागांसाठी रिंगणात असलेल्या १५६ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले. निकालानंतरच शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर विद्यापीठ विकास आघाडीचा की, सुटा संघटनेचा झेंडा फडकणार? हे स्पष्ट होईल.



शिवाजी विद्यापीठातील परीक्षा भवन दोनमध्ये सोमवारी सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने मतमोजणीची जय्यत तयारी केली आहे. अभ्यास मंडळे, विद्यापीठ शिक्षक या शाखांचे निकाल दुपारी लागणे अपेक्षित आहे. मात्र, सर्वांचे लक्ष लागुन राहिलेल्या पदवीधर आणि महाविद्यालयीन शिक्षक व विद्या परिषद शाखांचे निकाल मध्यरात्रीनंतर लागतील, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

**परीक्षा भवनमध्ये मतमोजणी : २५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती**


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2017
पुढारी

# विद्यापीठ निवडणूक आज मतमोजणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळ निवडणुकीची मतमोजणी सोमवारी (दि.२०) सकाळी नऊ वाजता सुरू होणार आहे. बहुतांश गटात नव्वद टक्क्यांच्या आसपास मतदान झाल्याने चुरस निर्माण झाली असून, निकालाकडे शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

विद्यापीठ निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि. १७) मतदान झाले. त्यानंतर सोमवारी सकाळपासून विद्यापीठाच्या परीक्षा भवन क्र.२ इमारतीत मतमोजणीस प्रारंभ होणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने क्षेत्रनिहाय मतपेट्यांची विभागणी केली असून त्यानुसार मतमोजणी होईल. अभ्यासमंडळे, विद्यापीठ शिक्षक शाखांचे निकाल दुपारपर्यंत लागण्याची शक्यता आहे. पदवीधर व महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषद शाखांचे निकाल उशिरा लागतील. निकालाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ परिसरात मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निकालाची तयारी पूर्ण झाली असून २५ ते ३० कर्मचारी कार्यरत असणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठातून

*मतमोजणीत कोणत्या गटाचा उमेदवार विजयी होईल याबद्दल उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. पदवीधर व शिक्षक गटात मतदारांची संख्या जास्त असल्याने यामधील निकालाकडे सर्वांचे लक्ष आहे.*

20 NOV 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सिनेट'चा आज फैसला

## निकालाबाबत उत्सुकता; बाजी कोण मारणार याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

नव्या विद्यापीठ कायद्यांतर्गत पहिल्यांदाच होत असलेल्या शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळांच्या (सिनेट) निवडणुकीसाठी गेल्या १७ नोव्हेंबरला सरासरी ६२ टक्के मतदान झाले असून, सोमवारी (ता.२०) मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. परीक्षा भवन येथे सकाळी नऊ वाजता मतमोजणीला प्रारंभ होईल. अधिकार मंडळांच्या ७२ जागांसाठी १५६ उमेदवार रिंगणात असून, यंदाच्या निवडणुकीत कोण कोणासोबत आहेत यावर निकालाचा गुलाल कोणाच्या अंगाला लागणार हे अवलंबून आहे.

शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचा (सुटा) सवता सुभा आणि त्यातूनही विभक्त झालेल्या सदस्यांनी नव्याने स्थापन करत रिंगणात उतरवलेली शिवाजी विद्यापीठ कॉलेज टीचर्स असोसिएशन (सुक्टा), विद्यार्थी कृती समिती तसेच प्राचार्य, शिक्षक, संस्थाचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी यांच्यासह विवेकानंद व रयतसारख्या मोठ्या संस्थांचा सहभाग असलेली शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी यांच्यात रंगलेली चुरस यामुळे 'सिनेट'च्या अधिकारी मंडळावर कोण बाजी मारणार हे सोमवारी ठरणार आहे.

गेल्या निवडणुकीत आघाडीसोबत 'सुटा' संघटना होती आणि यंदाच्या निवडणुकीत 'सुटा' आघाडीपासून वेगळी झाल्याचा मुद्दा निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच गाजला आहे. त्यातच 'सुटा'तही अध्यक्षपदाच्या शीतयुद्धातून फूट पडल्याने 'सुक्टा' या नव्या संघटनेने निवडणुकीत पाऊल टाकले आहे. जागावाटप प्रकियेत समाविष्ट न केल्यामुळे वारणा शिक्षण समूहाने आपली स्वत:ची वेगळी चूल मांडली असतानाच त्यांना विद्यापीठ विकास आघाडीने बरोबर घेतले आहे. शिक्षक खुल्या गटातील एक जागा वारणा शिक्षण समूहाला दिल्याने हे दोन्ही घटक विद्यापीठ निवडणुकीत एकत्र आले आहेत. याचा फायदा 'वारणा'च्या १३९ प्राध्यापकांना कसा होतो हे पाहणे रंजक ठरणार आहे.

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्यासाठी या गटातील निवडणूक प्रतिष्ठेची आहे. 'सुटा'तीलच काही सदस्यांनी काढलेल्या 'सुक्टा'मधून होणारी विभागणी 'सुटा'साठी आव्हान देणारी ठरणार आहे. खुल्या गटात अपक्ष उमेदवारांचे विकास आघाडी आणि 'सुटा'समोर आव्हान आहे. ते मतांच्या गणितात कसे पेलले जाईल याकडे लक्ष लागले आहे. यंदाच्या निवडणुकीत 'सुटा'ची बंडखोरी हा चर्चेचा मुद्दा राहणार आहे.

एकीकडे आघाडी आणि 'सुटा' यांच्यातील दुरंगी लढतीने उत्सुकता ताणली असतानाच विकास आघाडीच्या हातात हात घालून उतरलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा सहभाग निर्णायक ठरणार आहे. राज्यपालनियुक्त प्रतिनिधी म्हणून व्यवस्थापन परिषदेवर अभाविपचे कार्यकर्ते अमित कुलकर्णी यांची नियुक्ती झाल्याचाही परिणाम निकालातील जागांवर होणार आहे.

'पसंतीक्रमानुसार मतदान' ही पद्धत असल्यामुळे मतमोजणीमध्ये कुणाला पसंतीची पहिली पावती मिळते याचा निर्णय सोमवारी होणार आहे. विद्यापीठ शिक्षक गटात सर्वाधिक ९३ टक्के मतदान झाले आहे, तर नोंदणीकृत पदवीधर गटात सर्वांत कमी ४६ टक्केच मतदारांनी हक्क बजावला आहे. आजी-माजी विद्यार्थी कृती समिती पॅनेलला पदवीधर मतदारांकडून मोठ्या आशा आहेत, तर शिक्षक गटातील उमेदवारांची भिस्तही पदवीधर मतदारांवर काही प्रमाणात आहे. प्राचार्य, विद्यापरिषद या गटातील उमेदवारांसाठीही ९० टक्के मतदारांनी मतदानाला पसंती दिली आहे. यावेळी नव्या कायद्यानुसार होणाऱ्या मतमोजणीसाठी काही नियमांमध्ये बदल केले आहेत. पसंतीक्रमानुसार मोजणी केली जाणार असून, शेवटपर्यंत उत्सुकता ताणली जाणार आहे.

### मतमोजणी व निकाल आज

'सिनेट' निवडणुकीची मतमोजणी आणि निकाल घोषित करण्याची तयारी शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे पूर्ण झाली आहे. विद्यापीठाच्या परीक्षा भवन येथे सोमवारी सकाळी ९ वाजता मतमोजणीला प्रारंभ होणार आहे. पसंतीक्रमानुसार मतदारांनी केलेल्या मतपत्रिकांची मोजणी विशिष्ट पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येक गटातील उमेदवारांना मतदारांनी आपला पसंती क्रमांक दिला आहे. मतमोजणीसाठी २० टेबल मांडण्यात येणार असून, २५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



### विजयावर दोन्ही संघटनांचा दावा

**शुल्करचना, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा, परीक्षा पद्धती, निकालाचे वेळापत्रक यासह अनेक गोष्टी थेट विद्यार्थ्यांशी संबंधित आहेत. विद्यार्थ्यांना आजही अनेक गोष्टींसाठी रस्त्यावर उतरावे लागते. प्रश्नपत्रिकांतील चुकांपासून ते निकालातील गोंधळापर्यंत असलेल्या त्रुटींचा त्रास विद्यार्थ्यांना होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची सर्वाधिक पसंती विद्यार्थी कृती समितीला मिळण्याची खात्री आहे.**

**- डॉ. प्रवीण कोडोलीकर, अध्यक्ष, आजी-माजी विद्यार्थी कृती समिती**

**विद्यापीठात निकोप वातावरण निर्माण व्हावे, कारभार भ्रष्टाचारमुक्त व्हावा या धोरणातून विकास मंच निवडणूक लढवत आहे. विद्यापीठाचा शैक्षणिकस्तर वाढावा यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. भरती बंद झाल्यामुळे अनेक समस्या आहेत. आगामी काळात भरती प्रक्रियेबाबत आग्रही राहणार आहे. त्यासाठी विकासमंच विजेतेपदावर नाव कोरेल.**

**- डॉ. संजय डी. पाटील, अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी**

**शिक्षकांच्या प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे हा एकमेव अजेंडा आहे. मान्यता, सेवाशर्थी, वेतनआयोग, पेन्शन यांसह शिक्षकांच्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी संघ नेहमीच सक्रिय आहे. सिनेट मंडळांवर शिक्षकांच्या प्रश्नांची जाण एकमेव 'सुटा'ला असल्यामुळेच आमच्या वर्चस्वाला आव्हान देणे सोपे नाही.**

**- डॉ. आर. जी. कोरबू, सहकार्यवाह, 'सुटा'**

**सेवा सातत्य, निर्वाहनिधीसाठी खाते, पीएचडी वेतनवाढी लागू करण्याची मागणी, प्रमोशननंतरच्या काळातील फरकाची रक्कम मिळवून देण्यासाठी 'सुक्टा' काम करणार आहे. भविष्यात शिक्षकांच्या संशोधन विद्यापीठ फंडातून अधिविभागाच्या पर्यायाने शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी सिनेटच्या वर्तुळात येणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकांचा पाठिंबा 'सुक्टा'ला निश्चित मिळेल.**

**- डॉ. एन. बी. गायकवाड, सचिव, 'सुक्टा'**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 0 NOV 2017
सकाळ

# 'सिनेट'चा आज फैसला...

## परीक्षा भवनमध्ये होणार मतमोजणी; यंत्रणा सज्ज

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या (सिनेट) निवडणुकीचा फैसला उद्या (ता. २०) होणार आहे. शिक्षणासह राजकीय क्षेत्राचे निकालाकडे लक्ष आहे. परीक्षा भवनात सकाळी नऊपासून मतमोजणी प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. त्यासाठीची यंत्रणा सज्ज आहे.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या ७२ जागांसाठी कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील १५६ उमेदवार रिंगणात आहेत.



निवडणुकीपूर्वीच ११ अभ्यास मंडळे (विभागप्रमुख), संस्था प्रतिनिधी ६, नोंदणीकृत पदवीधर १, शिक्षक (अधिसभा) १ आणि प्राचार्य गटातील ८ जागा बिनविरोध झाल्या. तीन जिल्ह्यात १७ नोव्हेंबरला ३३ केंद्रावर

पान ९ वर »

# 'सिनेट'चा आज फैसला...

» पान १ वरून

निवडणूक प्रक्रिया पार पडली. सरासरी ६२ टक्के मतदान झाले. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, शिवाजी विद्यापीठ विकास मंच, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) व आजी-माजी विद्यार्थी कृती समितीच्या उमेदवारांचे भवितव्य शनिवारी मतपेटीत बंद झाले. शिक्षण क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातील दिग्गज मंडळांनी निवडणुकीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग नोंदवला होता.

तीन जिल्ह्यात अधिसभा प्राचार्य गटासाठी ८६, अधिसभा शिक्षक गटात ९०, विद्यापीठ शिक्षक गटासाठी ९३, नोंदणीकृत पदवीधरसाठी ४६ आणि अभ्यास मंडळासाठी ७८ टक्के मतदान झाले. उद्या (ता. २०) रात्री उशिरापर्यंत निकाल हाती येण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2017
Times of India

# Varsity sends academic data of 50k to online CDS

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has transferred the academic data of over 50,000 students to the Central Depository Services (India) Limited. The digital mark sheets and other testimonies will be made available soon, said a university official.

Mahesh Kakade, director of SUK board of exams and evaluation told **TOI** that the data has been transferred and a template of the digital mark sheets too has been created.

"The digital copy of the degree is being prepared under the National Academic Depository (NAD) initiative, and it will provide digital or a printed copy of the degree or academic award with security features to students or other authorised users. It will verify academic awards online on the same day of request initiated by any authorised user," he said.

NAD will maintain the authenticity, integrity and confidentiality of its database. It will also train and facilitate academic institutions, boards, and eligibility assessment bodies to efficiently update academic awards in the database.

Earlier in January, the SUK signed an MoU with CDSL for setting-up the NAD cell. "The steps are taken to ensure transparency into the system," Kakade said.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2017
लोकमत

# अधिसभेचा आज फैसला

## शिवाजी विद्यापीठ : पहिला निकाल अकरापर्यंत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि अन्य अधिकार मंडळांवर कुणाची सत्ता येणार याचा फैसला आज, सोमवारी होणार आहे. सकाळी नऊ वाजल्यापासून विद्यापीठातील परीक्षा भवन क्रमांक दोनमध्ये मतमोजणीची प्रक्रिया सुरु होईल.

या निवडणुकीच्या रिंगणात शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच, आजी-माजी विद्यार्थी कृती समिती आणि विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) आपली ताकद पणाला लावली. त्यामुळे या निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि. १७) मोठ्या चुरशीने सरासरी ६२ टक्के मतदान झाले. या मतमोजणी प्रक्रियेच्या पूर्वतयारीची पाहणी रविवारी दुपारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केली. आपल्या उमेदवारांना किती मते मिळतील, आपले आणि विरोधकांचे बलाबल हे गटनिहाय कसे राहिले याची आकडेवारी, अंदाज व्यक्त करण्यात निवडणूक लढविलेल्या आघाडी आणि युतीतील संघटनांचे पदाधिकारी, उमेदवार आणि कार्यकर्ते व्यस्त होते. दरम्यान, मतमोजणीची तयारी विद्यापीठ प्रशासनाकडून पूर्ण झाली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले. ते म्हणाले, मतमोजणीसाठी २५ अधिकारी-कर्मचारी कार्यरत असतील. पंधरा टेबलांवर मतमोजणी होईल. गटनिहाय मतपेट्यांचे वर्गीकरण केले आहे. सोमवारी सकाळी विद्यापीठ शिक्षक गटातील मतमोजणीने सुरुवात होईल.

मतमोजणीची सुरुवात विद्यापीठ शिक्षक गटाने होणार असून, या गटाचा पहिल्यांदा निकाल लागेल. पहिला निकाल सकाळी अकरापर्यंत जाहीर होईल. त्यानंतर अभ्यास मंडळे, अधिसभा प्राचार्य, अधिसभा शिक्षक, विद्या परिषद शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर गट घेतले जातील. पसंतीक्रमानुसार मतदान झाले असल्याने मतमोजणीला जादा वेळ लागणार आहे. रात्री उशिरापर्यंत ही प्रक्रिया चालणार असल्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2017
पुण्यनगरी

# सिनेटची आज मतमोजणी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांसाठी शुक्रवारी झालेल्या मतदानाची सोमवारी मतमोजणी होणार आहे. सकाळी ९ वाजल्यापासून विद्यापीठातील परीक्षा भवन क्रमांक दोनमध्ये मतमोजणीची प्रक्रिया सुरू होणार असून, मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने आहे, हे दुपारपर्यंत स्पष्ट होणार आहे.

विविध अधिकार मंडळे आणि अधिसभेच्या या निवडणुकीमुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील शैक्षणिक क्षेत्र गेल्या महिनाभरापासून ढवळून निघाले होते. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच, आजी-माजी विद्यार्थी कृती समिती आणि विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) आपली ताकद पणाला लावली. त्यामुळे या निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि. १७) मोठ्या चुरशीने सरासरी ६२ टक्के मतदान झाले. मतमोजणी प्रक्रियेच्या पूर्वतयारीची पाहणी रविवारी दुपारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केली. मतमोजणीची तयारी विद्यापीठ प्रशासनाकडून पूर्ण झाली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले. ते म्हणाले, मतमोजणीसाठी २५ अधिकारी-कर्मचारी कार्यरत असतील. पंधरा टेबलांवर मतमोजणी होईल. गटनिहाय मतपेट्यांचे वर्गीकरण केले आहे. सोमवारी सकाळी विद्यापीठ शिक्षक गटातील मतमोजणीने सुरुवात होईल.